0 5 MAY 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू

**१० जूनपर्यंत अर्जाची मुदत**



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध पदवी, पदव्युत्तर व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिले आहे किंवा जे नोकरी-व्यवसाय सांभाळून उच्च शिक्षण घेऊ इच्छितात, अशा विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी १० जून, २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन प्र. संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले आहे.

या प्रवेश प्रक्रियेमध्ये दूरशिक्षणच्या माध्यमातून बी. ए., बी. कॉम. तसेच एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम., एम. एस्सी. (गणित) आणि एम.बी.ए. या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विशेष म्हणजे पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने एम.बी.ए., एम. कॉम. व एम. एस्सी. (गणित) हे अभ्यासक्रमही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यासोबतच १५ हून अधिक व्यावसायिक प्रमाणपत्र अभ्यासक्रमही विद्यार्थ्यांना करता येतील. डॉ. कृष्णा पाटील यांनी सांगितले की शासकीय, निमशासकीय व खासगी क्षेत्रातील कर्मचारी, उद्योजक, शेतकरी, गृहिणी, कामगार आणि सैनिक यासारख्या विविध घटकांसाठी हे केंद्र अत्यंत उपयुक्त ठरत आहे. विद्यापीठाची राज्यभरात ८६ अभ्यास केंद्रे असून, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही या माध्यमातून शिक्षणाची सुविधा घरबसल्या उपलब्ध झाली आहे.

0 5 MAY 2026
सकाळ

# विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध पदवी, पदव्युत्तर व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी १० जूनपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत. या प्रवेश प्रक्रियेत बी.ए., बी.कॉम. एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एमबीए यांसारख्या दूरशिक्षण अभ्यासक्रमांचा समावेश आहे. ऑनलाइन पद्धतीने एमबीए, एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) हे अभ्यासक्रम उपलब्ध असून विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांनाही प्रवेश दिला जाणार आहे. नियमित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दुहेरी पदवी घेण्याची संधी उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण केंद्राशी किंवा जवळच्या अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.